प्र.क्र. का.4/450/15/लीस पेंडन्स/ 1302
नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे, तळमजला,
नवीन प्रशासकीय इमारत, पुणे 1.
दिनांक 5/8/2015

**विषय-** नोटीस ऑफ लीस पेंडन्सच्या दस्ताची नोंदणी करणेबाबत.

**परिपत्रक:-**

मा. उच्च न्यायालय. मुंबई यांचेसमोरील याचिका क्र. 10050/2013 व इतर याचिकांमधील मा. न्यायालयाच्या दिनांक 27/2/2014 रोजीच्या आदेशामध्ये असे नमूद आहे की, नोटीस ऑफ लीस पेंडन्स दस्तांची नोंदणी करताना दस्तामध्ये ट्रान्सफर ऑफ प्रॉपर्टी अॅक्ट, 1882 चे कलम 52 च्या पोटकलम 2 मध्ये विहित असलेल्या सर्व बाबी जसे की, सूट नंबर, वादी, प्रतिवादी यांचा समावेश नसल्यामुळे एखादया मिळकतीबाबत सुरु असलेल्या न्यायालयीन प्रकरणाची सर्वंकष माहिती पक्षकारांना मिळत नसल्याची बाब निदर्शनास आली आहे.

या अनुषंगाने मा. अॅडव्होकेट जनरल यांनी ट्रान्सफर ऑफ प्रॉपर्टी अॅक्ट, 1882 चे कलम 52 च्या पोटकलम 2 मध्ये *विहित सर्व बाबी* नोटीस ऑफ लीस पेंडन्सच्या दस्तामध्ये *नमूद नसतील तर नोटीस ऑफ लीस पेंडन्स दस्ताची नोंदणी करण्यात येवू नये अशा सूचना दुय्यम निबंधक यांना देण्यात याव्यात* असे अभिमत शासनास दिले आहे.

या पार्श्वभूमीवर, राज्यातील सर्व दुय्यम निबंधक यांना कळविणेत येते की,

1) ट्रान्स्फर ऑफ प्रॉपर्टी अॅक्ट, 1882 चे कलम 52 (2) खालीलप्रमाणे आहे.

*52(2)- Every notice of pendency of a suit or proceeding referred to in sub section (1) shall contain the following particulars, namely –*

*(a) the name and adress of the owner of immovable property or other person whose right to the immovable property is in question;*
*(b) the description of the immovable property the right to which is in question;*
*(c) the Court in which the suit or proceeding is pending;*
*(d) the nature and title of the suit or proceeding; and*
*(e) the date on which the suit or proceeding was instituted.*

**2)** नोटीस ऑफ लीस पेंडन्सच्या दस्तामध्ये, ट्रान्स्फर ऑफ प्रॉपर्टी ॲक्ट, 1882 चे कलम 52 च्या पोटकलम 2 मध्ये विहित असलेल्या उपरोक्त सर्व बाबी नमूद आहेत याची खात्री करुनच असा दस्त नोंदणीस स्वीकारण्यात यावा.

सदरचे परिपत्रक या विभागाच्या www.igrmaharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रकाशने > परिपत्रके > नोंदणी या ठिकाणी उपलब्ध आहे.

**(सही/- डॉ.रामास्वामी एन)**
**नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे.**

**प्रति,**

सर्व दुय्यम निबंधक (संबंधित नोंदणी उपमहानिरिक्षक यांचेमार्फत)

**प्रत-** 1) सर्व सह जिल्हा निबंधक (संबंधित नोंदणी उपमहानिरिक्षक यांचेमार्फत) माहिती व योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी.
2) सर्व नोंदणी उपमहानिरिक्षक याना माहिती व पुढील योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी.
3) सर्व कार्यासन अधिकारी, नोंदणी महानिरिक्षक कार्यालय, पुणे यांना माहितीस्तव.
4) कार्यासन अधिकारी महसूल व वनविभाग, (म-1) मंत्रालय, मुंबई 32

**निर्गमित,**

**नोंदणी उपमहानिरिक्षक (मुख्यालय)**
**महाराष्ट्र राज्य, पुणे.**